# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक

## (१) शिक्षणाची सुरुवात :

प्राचीन काळापासून ते ब्रिटिशाच्या अगमनापर्यन्त भारतात धार्मिक शिक्षणाचा पायंडा होता. त्या काळामध्ये केवळ ब्राह्मण जातीच्या लोकांच्या पूरते शिक्षण मर्यादित ठेवण्यात आले होते. त्यानाच अध्ययन आणि अध्यापनाचा अधिकार प्राप्त झालेला होता आणि इतर जातीच्या लोकांना शिक्षणापासून पूर्णपणे वंचित ठेवण्यात आले होते. विशेषत: शूद्र जातीच्या लोकांना सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि शैक्षणिक अधिकारांपासून संपूर्णपणे अलिप्त ठेवण्यात आले होते. आणि त्यांना तसे वंचित ठेवण्यामागे समाज व्यवस्थेतच तशी व्यवस्था करुन ठेवलेली होती. शूद्र जातीच्या लोकांना इतर उच्च जातीच्या लोकांची सेवाचाकरी करण्या-व्यतिरिक्त त्यांनी शिक्षण घेणे अयोग्य आणि अधार्मिक समजले जात होते. कारण तो त्यांचा अधिकार नव्हता. शिक्षणाचा अधिकार केवळ ब्राह्मण जातीच्या लोकांच्यापूरताच मर्यादित ठेवल्यामुळे इतर जातीच्या तुलनेत शूद्रजातीच्या लोकांना शिक्षणापासून वंचित राहाणे भाग पडले होते. शूद्र जातीच्या लोकांना शिक्षणाची संधी न मिळाल्यामुळे त्यांचा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकास होऊ शकला नाही. अद्यापही ग्रामीण समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार फारसा न झाल्या-मुळे शूद्र जाती बरोबर इतर जातीच्या लोकांना-सुध्दा शिक्षणाचे महत्व फारसे पटलेले दिसत नाही, त्यामुळे ग्रामीण भागामध्ये शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या लोकांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

प्राचीन शिक्षण पध्दती अध्यात्म, नीती व आचरण प्रधान होती. विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार घडवावेत म्हणून ४० संस्कारांची व्यवस्था केली होती. व्यक्तीची अविद्या, निवृत्ती या आत्मप्राप्तीची मिमांसा, सहिष्णुता, क्षमा व निष्कामकर्म या तीन तत्वावर आधारित शिक्षण दिले जात असे व शिक्षण घेतले जात असे. ज्ञानाबद्दल अत्याधिक आदर असे. परंतु प्राचीन आर्य

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR.
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शिक्षण पध्दती कालओघात २०व्या शतकात बदललेली आहे. मोंगलांचा शिक्षणावरील अघोरी हल्ला, बाराव्या शतकात मोंगल, अफगाण, पठाण इत्यादी लोकांमुळे भारतातील जुने विचार संपुष्टात आले या परिस्थितिबद्दल अलबेरुनी लिहितात विव्दानाना पूर्वीचा बहुमान व मोबदला मिळेनासा झाल्यामुळे व्यासंगी विद्यार्थ्यांची समस्या व चिकाटी कमी झाली. मोंगलाच्या विजयाने जुन्या पाठशाळा बंद झाल्या व भारतातील जीवन बदलून गेले.

मोंगलाचे साम्राज्य नष्ट झाल्यानंतर भारत देशावर इंग्रजांचा अमल सुरु झाला. इंग्रजांनी भारतावर जवळ जवळ दिडशे वर्षे राज्य केले. ब्रिटिशानी भारतात आधुनिक शिक्षण पध्दती इ.स.१८१३ साली पास झालेल्या सनदी कायद्याने सुरु केली. या कायद्याने हिंदुस्थानातील सत्ता प्रस्तापित केलेल्या भागामध्ये वाड्.मयाची सुधारणा, विद्वानांना उत्तेजन व शास्त्रीय ज्ञानाची वाढ करण्याचे ठरविले. त्यांनी त्यांच्या राजवटीमध्ये वेळोवेळी शैक्षणिक योजना आणि शिक्षण आयोगाच्या नेमणूका करुन भारतातील सर्व जाती धर्माच्या आणि वंशाच्या लोकांना शिक्षण देण्याला सुरुवात केली. मात्र भारतीय शिक्षणाच्या विकासामागे त्यांचे साम्राज्यवादी धोरण होते. इंग्रजांनी आपले आचार-विचार भारतीयांवर लादले. नवीन पध्दतीच्या शैक्षणिक संस्था काढल्या. समाजात विद्या व विज्ञान या विषयी आदर निर्माण केला व जुने आध्यात्माबद्दल शिक्षण संपुष्टात आले. सन १८१८ ला माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन मुंबई इलाख्याचे गव्हर्नर झाले. त्यांनी मुंबई आणि इतर जिल्ह्यात शाळा उघडण्यास प्रोत्साहन दिले. इ.स.१८५४ च्या वुडच्या खलीत्याप्रमाणे सन १८५५ पासून भारतीय शिक्षण पध्दतीला ब्रिटिशांनी त्यांच्या देशाप्रमाणे राबविण्यास सुरुवात केली. भारतीयांना शिष्यवृत्ती देऊन ऑक्सफोर्ड विद्यापीठात पाठविले जाई. भारतीयांच्या देहात इंग्रजी मन उत्पन्न होईल असे उपक्रम हाती घेतले जाउ लागले. पाश्चात्यांच्या भौतिक विचारावर भारतीय मोहित झाला. परंतु इंग्रजांच्या शिक्षणपध्दतीमुळे भारतातील धार्मिक पायावर आधारित शिक्षण पध्दतीचा हळूहळू ऱ्हास होऊ लागला. आणि भारतीय समाजात केवळ विशिष्ट वर्गापूरती मर्यादित असणारी शिक्षण पध्दती बदलून भारतातील सर्व जाती, धर्माच्या

लोकांना शिक्षणाचे दरवाजे उघडे करण्यात आले.

## (२) स्वातंत्र्यप्राप्ती नंतरचे शिक्षण --

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारतात ज्या योजना तयार करण्यात आल्या त्यात शिक्षणासाठी फारच मोठ्या प्रमाणात लक्ष दिलेले आढळते. परंतु तरीही शिक्षण ही समस्या आणखीनही सुटलेली नाही. पूर्वी पेक्षाही या समस्येचे स्वरुप अधिकच तीव्र झालेले आहे. थिऑसॉफीच्या प्रणेत्या व जगप्रसिध्द विदुषी डॉ.अॅनी बेझंट यांनी इंग्रजी शिक्षणावर टीका करताना म्हटले आहे की, इंग्रजानी जे शिक्षण भारतीयांना दिले त्यात शारीरिक व भावनिक विकास झालाच नाही - आणि भारताचे शैक्षणिक आदर्श या-कडेही त्यांनी दुर्लक्ष केले, त्यामुळे भारतीय शिक्षणपध्दती सूत्रबध्द होऊ शकली नाही. भारतातील अनेक समाजसुधारकांनी आणि शिक्षणप्रेमी विचारवंतांनी शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोग केलेले आढळतात. लोकमान्य टिळकांनी पुण्याची ' राष्ट्रीय शिक्षण संस्था ' महात्मा गांधी यांची ' वर्धा बेसिक शिक्षण योजना ' रविन्द्रनाथ टागोर यांनी ' शांतिनिकेतन ' स्थापन केले. स्वामी दयानंद यांनी ' कानडी विश्वविद्यालय ' स्थापन केले. या सर्वांतून संस्कार घडविण्याचे प्रयत्न झाले. परंतु लवकरच याचे अस्तित्व संपले म्हणून त्यावेळी भारतात चांगले संस्कार घडविणा-या संस्थाही संपुष्टात आल्या आणि त्या-नंतर भारतातील शिक्षण एकत्रित स्वरुपाचे करण्यात आले.

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतात जवळ पास ८० टक्के लोक ग्रामीण भागात राहातात. ग्रामीण भागातील लोक शैक्षणिकदृष्टया अधिक प्रमाणात वंचित राहिले आहेत. भारतीय लोकसंख्यातील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण नगण्य आहे, त्यामुळे त्या त्यांच्या मुलांचे पालण-पोषण योग्यरित्या करु शकत नाहीत म्हणून त्यासाठी साक्षरतेच्या बाबतीत दुर्लक्षित झालेल्या ग्रामीण जनतेला साक्षर करण्याच्यादृष्टिने प्रयत्न झाले पाहिजेत. समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण एक अत्यंत आवश्यक प्रक्रिया आहे. शिक्षणाव्दारेच राष्ट्रीय आणि

आंतरराष्ट्रीय भावना विकसित होतात. भारतातील आधुनिक काळातील शिक्षण इंग्रजाच्या संस्कारांनी तयार झालेले आहे. मॅकालेनी या इंग्रजाच्या शिक्षणाबद्दल जे विधान केले आहे त्यात ते म्हणतात, "इंग्रजी शिक्षण अशा पध्दतीचे होते की त्यात रक्त आणि रंग भारतीय आहे परंतु आचार-विचार मात्र इंग्रजी होते" इंग्रजी पध्दती पासून शिक्षण क्षेत्रात अनेक घडामोडी घडून आल्या, नवनवीन बदल आणि कार्यक्रम राबविण्यात आले व शिक्षणाचा प्रसार करण्याचे प्रयत्न झाले. १८५४ मध्ये वुडचे घोषणापत्र, १८८२ मध्ये हंटर आयोग, १९०८ भारतीय विश्वविद्यालय अधिनियम, १९१४ सर्जेंट आयोग, १९४८ राधाकृष्ण आयोग, १९५२ मुदलियार आयोग आणि १९६४ कोठारी आयोग. या सर्व आयोगामार्फत शिक्षणाच्या धोरणास वेळोवेळी बदल करुन शिक्षण प्रसाराला जोर देण्यात आला आणि त्याबरोबर समाजात सुधारणा घडवून आणल्या. परंतु वर्तमान आर्थिक परिस्थिती सोडविण्याच्यादृष्टीने शिक्षण कुचकामी ठरले.

फाळणीपूर्व भारतात साक्षरतेचे प्रमाण १९४१ च्या जनगणनेनुसार केवळ १६.१ टक्के होते. यावरुन भारतामध्ये बहुसंख्य लोक शिक्षणापासून अलिप्त राहिल्याचे स्पष्ट होते, त्यामुळे त्या काळात लोकांच्यामध्ये अज्ञान, दारिद्र्य व मागासलेपणा अधिक प्रमाणात होता. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुसंख्य लोकांना शिक्षण देऊन त्यांना साक्षर केल्या शिवाय समाजाची प्रगती होणार नाही हे तज्ज्ञानी व थोर समाज सुधारकांनी जाणले होते. आणि त्यामुळे शहरी आणि विशेषत: ग्रामीण समाजात शिक्षण प्रसाराला गती देण्यात आली. प्राथमिक शिक्षण ही एक प्रत्येक मुलांची आवश्यक आणि मूलभूत गरज आहे हे जाणून जगातील सर्व प्रगत देशात प्राथमिक शिक्षण मोफत व सार्वत्रिक करण्यात आले. भारतातही घटनेच्या ४५ व्या कलमानुसार प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्याचे उद्‌घोषिले आहे. जुन्या मुंबई राज्यात इ.स.१९४७ सालीच सार्वत्रिक मोफत शिक्षण आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा मंजूर करण्यात आला आहे व त्याची अंमलबजावणी सर्व राज्यभर करण्यात आली. नामदार गोपालकृष्ण गोखले यांनी सक्तीच्या

प्राथमिक शिक्षणासाठी भगीरथ प्रयत्न केले. इ.स.१९१० ते १९१३ साली दि.१० मार्च १९१० रोजी ठराव मांडला, त्या निमित्ताने जी भाषणे केली ती प्राथमिक शिक्षणाच्या महत्वाची निदर्शक आहेत. देश पारतंत्र्यात असताना नामदार गोखले यांनी प्राथमिक शिक्षणामुळे समाजाचा एकूण दर्जाच उंचावतो असे जे म्हटले आहे त्याची आज स्वातंत्र्योत्तर कालात व विशेषत: लोकशाही-प्रणाली स्वीकारलेल्या भारत देशात अतिशय गरज आहे. प्राथमिक शिक्षण लोकशाहीच्या यशाचा मूलाधार आहे.

(अ) साक्षरतेतील वृध्दी --

भारतीय घटनेच्या ४५ व्या कलमानुसार १४ वर्षापर्यन्तच्या मुला-मुलींना सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचे कर्तव्य शासनाने स्वीकारले होते. भारतीय राज्यघटना अमलात आल्यापासून १० वर्षात १४ वर्षापर्यन्तच्या मुला-मुलींना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचे कार्य पूर्ण करण्यात येईल अशी शासनाची योजना होती. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळून ४० वर्षे पूर्ण होऊनही भारताने शैक्षणिक प्रगती फारशी साधलेली नाही. शिक्षणापासून वंचित राहणारा वर्ग अद्याप मोठा असून त्यात स्त्री वर्गाचे प्रमाण अत्याधिक आहे. १९८१ च्या साक्षरतेच्या आकडेवारीवरुन त्याची स्पष्ट कल्पना येऊ शकते. अर्थात साक्षरतेचे हे प्रमाण लक्षात घेता सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासंबंधिची शासनाची योजना किती प्रमाणात सफल झाली आहे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. भारतात शिक्षण प्रसारासाठी निरनिराळे कार्यक्रम, योजना राबवून शिक्षणापासून अलिप्त राहिलेल्या मुला-मुलींना शिक्षणाचा लाभ प्राप्त करुन देण्याचे प्रयत्न झाले. परंतु १९०१ ते १९८१ पर्यन्तच्या ८० वर्षातील साक्षरतेत झालेली वाढ विचारात घेता साक्षरतेच्या वाढीचा वेग कमी आहे हे पुढील तक्त्यावरुन ध्यानात येते.

तक्ता क्रमांक १

साक्षरतेतील वाढ (१९०१ ते १९८१ ) ( दर हजारी )

| वर्ष | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| १९०१ | ५३ | ९८ | ६ |
| १९११ | ५९ | १०६ | ११ |
| १९२१ | ७२ | १२२ | १८ |
| १९३१ | ९५ | १५६ | २९ |
| १९४१ | १६१ | २४९ | ७३ |
| १९५१ | १६७ | २४९ | ७९ |
| १९६१ | २४० | ३४४ | १३० |
| १९७१ | २९४ | ३९५ | १८७ |
| १९८१ | ३६२ | ४६७ | २४८ |

आधार : लोक-संख्या शिक्षण, संचालक, शिक्षण शास्त्र संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, १९८२, पृ. 20.

वरील प्रमाणे साक्षरतेचे प्रमाण पाहता साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत असली तरी ती कमी आहे. १९०१ ते १९४१ पर्यन्तच्या स्वातंत्र्यपूर्वकाळातील साक्षरता दर हजार व्यक्तीमागे ५३ व्यक्तीवरुन १६१ व्यक्तीपर्यन्त वाढली. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात १९५१ सालापासून पंचवार्षिक योजनाव्दारे शिक्षणावर अधिक खर्च करुनही १९५१ ते १९८१ या ३० वर्षाच्या काळातही साक्षरतेच्या प्रमाणात विशेषवृध्दी झालेली नसल्याचे वरील तक्त्यातील माहितीच्या विश्लेषणावरुन स्पष्ट दिसते.

(ब) स्त्री-पुरुष साक्षरता --

भारत सरकारने आणि महाराष्ट्र सरकारने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर

शैक्षणिक प्रगतीला अधिक जोर देण्याच्या दृष्टीने अनेक शैक्षणिक उपक्रम राबविले. परंतु त्यातून फारसे काही साध्य झाले असे म्हणता येत नाही. भारतात सामाजिक चाली-रिती, परंपरा व रुढी यांचा पगडा अधिक असल्यामुळे स्त्रियांच्या शिक्षणात नगण्य स्वरुपात प्रगती झाली आहे, तर पुरुषांच्या शिक्षणात जवळ जवळ ५० टक्केच प्रगती झालेली आहे. भारतातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देऊन १०० टक्के लोकांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले असताना शासनाला फक्त ५० टक्के साक्षरतेचे लक्ष गाठता आले आहे. अजून ५० टक्के शैक्षणिक प्रगतीचा मार्ग गाठावयाचा आहे. सन १९६१ ते १९८१ पर्यन्तच्या २० वर्षात स्त्रियां आणि पुरुष यांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण किती आहे हे पुढील तक्त्यावरुन ध्यानात येऊ शकते.

## तक्ता क्र.२

### स्त्री-पुरुष साक्षरता ( १९६१ ते १९८१ )

| राज्य | व्यक्ति | १९६१[1] | १९७१ | १९८१ |
|---|---|---|---|---|
| भारत | एकूण | २४.० | [2] २९.५ | [3] ३६.२३ |
| | पुरुष | ३४.५ | ३९.४९ | ४६.८९ |
| | स्त्रिया | १३.० | १८.४७ | २४.८२ |
| महाराष्ट्र | एकूण | २९.८२ | ३९.१८ | [2] ४७.१८ |
| | पुरुष | ४२.०४ | ५१.०४ | ५८.७९ |
| | स्त्रिया | १६.७६ | २६.४३ | ३४.७९ |
| कोल्हापूर जिल्हा | एकूण | २६.३० | [5] ३५.३७ | [4] ४५.३६ |
| | पुरुष | ४०.०९ | ४९.७८ | ५९.४५ |
| | स्त्रिया | १२.०४ | २०.३४ | ३०.७९ |
| करवीर तहसिल | एकूण | ३७.९७ | [6] ४५.९५ | ५६.२४ |
| | पुरुष | ५१.४० | ५८.८९ | ६८.०० |
| | स्त्रिया | २३.२९ | ३१.७२ | ४३.२७ |
| कागल तहसिल | एकूण | २२.६१ | ३०.१७ | ४०.६३ |
| | पुरुष | ३७.०९ | ४५.७८ | ५६.६७ |
| | स्त्रिया | ७.६६ | १३.८४ | २४.२२ |

आधार : १. Census of India, 1961, Vol.X Part II-A, General Population Table, p.224.

2. Census of India, 1981, Series-12, Maharashtra, Primary Census Abstract, p.25.

3. Census of India, 1981, Series-I, Paper-3, Provisinal Population, p.121.

4. Census of India, 1981, District Census Handbook, Kolhapur, p.18.

5. District Statistical Abstract of Kolhapur District, 1972-73, p.104.

6. Directorate of Education M.S., Pune, 1980-81, p.123.

वरील तक्त्यातील माहितीच्या विश्लेषणावरुन १९६१ ते १९८१ पर्यन्त साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाली आहे. परंतु एकूण लोकसंख्यावाढीच्या प्रमाणात ही वाढ अत्यंत कमी आहे. १९८१ च्या जनगणनेनुसार भारतात एकूण साक्षरतेचे प्रमाण ३६.२३ टक्के आहे पैकी पुरुष ४६.८९ टक्के व स्त्रिया २४.८२ टक्के साक्षर आहेत. महाराष्ट्रामध्ये साक्षरतेचे एकूण प्रमाण ४७.१८ टक्के आहे पैकी पुरुष ५८.७९ टक्के व स्त्रिया ३४.७९ टक्के साक्षर आहेत. कोल्हापूर जिल्हामध्ये एकूण साक्षरतेचे प्रमाण ४५.३६ टक्के आहे, पैकी पुरुष ५९.४५ टक्के आणि स्त्रिया ३०.७९ टक्के साक्षर आहेत. यावरुन सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, अद्यापही देशात पुरुष निरक्षरांचे प्रमाण जवळ जवळ निम्म्याहून अधिक आहे तर स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण पुरुषाच्या पेक्षा अधिक असून ते जवळ जवळ ७० ते ७५ टक्के एवढे आहे. अर्थात शिक्षण प्रसाराचा डंका समाजात प्रभाविपणे पिटला जात असला तरी शिक्षणापासून वंचित राहणारा वर्ग मोठा आहे आणि त्यात स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

(क) महाराष्ट्रातील शहरी - ग्रामीण साक्षरता --

१ मे १९६० ला महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. महाराष्ट्र राज्य स्थापने नंतर महाराष्ट्रात शिक्षणप्रसाराला गती देण्यासाठी निरनिराळ्या अभ्यास प्रेमी विचारवंतानी, शास्त्रज्ञांनी आणि प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाने निरनिराळे शैक्षणिक उपक्रम आणि कार्यक्रम राबवून महाराष्ट्र राज्याचा सर्व बाजूनी कायापालट घडवून आणण्याचा निश्चय केला गेला आणि त्या दिशेने पाउले उचलली गेली. महाराष्ट्र राज्य डोंगर, पर्वत, पठार, नद्या-नाले अशा नैसर्गिक गोष्टींनी व्याप्त आहे. परिणामी दळणवळणाच्या साधणात फारशा सुधारणा करणे शक्य झाले नाही, त्यामुळे शिक्षण प्रसाराला जी गती येणे शक्य होते ती येऊ शकली नाही. शिक्षण प्रसाराचे लोण नैसर्गिकदृष्टया दुर्गम भागात वसलेल्या दऱ्या-खोऱ्यातील आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील लोकांच्या पर्यन्त जाऊन पोहोचू शकलेले नाही. अर्थात

अशा ग्रामीण भागातील माणूस शिक्षणापासून अधिक प्रमाणात वंचित राहिलेला पाहावयास मिळतो. शिक्षणाचा लाभ शहरी समाजा पेक्षा ग्रामीण समाजातील लोकांना न मिळाल्यामुळे त्याच्यात अज्ञान, अंध:श्रध्दा, दारिद्र्य यांनी त्यांना वेढून टाकले आहे. आणि त्यांच्या जीवन विकासाच्या वाटा आपोआप कुंठल्या गेल्या. भारत सरकार प्रमाणेच महाराष्ट्र सरकारनेही पंचवार्षिक योजनाच्या-व्दारे शिक्षण प्रसार करुन निरक्षरांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रत्येक वस्तीच्या ठिकाणी शाळा सुरु करण्याच्या विचारांने प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि उच्च महाविद्यालयीन शिक्षण देणा-या संस्थांत वाढ केली. त्याच बरोबर शाळामधून अध्यापनाचे काम करणा-या शिक्षकांची भरती करुन आणि शिक्षण विभागावर अधिक प्रमाणात खर्च करुन शहरी आणि ग्रामीण समाजातील मुला-मुलींना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी पाऊल उचलले. परंतु शिक्षणाच्या सोयींची उपलब्धता दळणवळणाची सोय असणा-या शहरी भागामध्ये अधिक प्रमाणात केली गेली तर दळणवळणाची सोय नसलेल्या ग्रामीण विभागामध्ये शैक्षणिक सोईची उपलब्धता कमी प्रमाणात करण्यात आली. आणि याचाच परिणाम असा झाला की, समाजात शैक्षणिक प्रगतीत असंतुलन निर्माण झाले. महाराष्ट्रामध्ये ब-याच वाड्या-वस्त्या आणि गांवामध्ये शाळेची सोय अजिबात नाही. ज्या वाड्या - वस्त्या आणि गावामध्ये शाळेची सोय नाही तेथील मुले-मुली शाळेची सोय असलेल्या गावामध्ये दूरवर चालत जाऊन शिक्षण घेतात. काही मुले दूरवर- चालत जावे लागते म्हणून शाळेला जात नाहीत. पावसाळ्याच्या दिवसात या मुला-मुलींचे फार हाल होतात. मुला-मुलींना शाळेसाठी दुस-या गावी चिखलातून, नद्या, नाले, डोंगर पार करुन जावे लागते. मुलांचे बरेच पालक त्यांच्या मुलांना अडचणीच्या परिस्थितीमुळे शाळेला न पाठवता त्यांच्या बरोबर शेती कामे करण्यासाठी सोबत घेऊन जातात. मुलींच्याबाबतीत त्याचे पालक त्यांना दूर गावी शाळेला पाठविण्यास नाखूश असतात. त्यांना असे वाटते की दूस-यागावी एकटी-दुकटीला आडराणातून शाळेला पाठविण्यापेक्षा शाळा न शिकता घरातील मनावे

चारुण आणून घरी राहिली तरी चालेल. त्याच बरोबर शहरी समाजा-पेक्षा ग्रामीण समाजात शैक्षणिक वातावरणाचा आणि मुलांच्या पालकांचे अज्ञान, अध:श्रध्दा ,दारिद्र्य आणि मुलांच्या शिक्षणविषयक जाणीवांचा अभाव, यामुळेही शहरी समाजापेक्षा ग्रामीण समाजात शैक्षणिक वंचिततेचे प्रमाण अधिक आहे. शहरी आणि ग्रामीण समाजातील शैक्षणिक असंतुलन १९८१ च्या साक्षरतेच्या आकडेवारीवरुन पुढील प्रमाणे ध्यानात येऊ शकते :--

तक्ता क्र.३

शहरी आणि ग्रामीण साक्षरता (१९८१ च्या जनगणनेनुसार)

| राज्य | एकूण | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|---|
| भारत[2] | एकूण | ३६.२३ | ४६.८९ | २४.८२ |
| | ग्रामीण | २९.५७ | ४०.६२ | १७.९९ |
| | शहरी | ५७.१९ | ६५.५८ | ४७.६५ |
| महाराष्ट्र राज्य[1] | एकूण | ४७.१८ | ५८.७९ | ३४.७९ |
| | ग्रामीण | ३८.१५ | ५१.२५ | २४.८८ |
| | शहरी | ६३.९२ | ७१.८० | ५४.६५ |
| कोल्हापूर जिल्हा[3] | एकूण | ४५.३६ | ५९.४५ | ३०.७९ |
| | ग्रामीण | ३९.७८ | ५५.१४ | २४.३१ |
| | शहरी | ६२.२६ | ७१.८८ | ५१.५१ |
| करवीर तहसिल | एकूण | ५६.२४ | ६८.०० | ४३.२७ |
| | ग्रामीण | ४१.८५ | ५७.९६ | २४.२५ |
| | शहरी | ६६.६६ | ७५.२२ | ५७.१६ |
| कागल तहसिल | एकूण | ४०.६३ | ५६.६७ | २४.२२ |
| | ग्रामीण | ३८.४३ | ५४.१४ | २१.६३ |
| | शहरी | ५४.४३ | ६७.२४ | ४०.७९ |

आधार : 1. Census of India, 1981, Series-12, Maharashtra, Primary Census Abstract, p.25.
2. Census of India, 1981, Series-I, Paper-3, Provisional Population, p.121.
3. Census of India, 1981, District Census Handbook, Kolhapur, p.18.

तक्त्यातील शहरी आणि ग्रामीण साक्षरतेची आकडेवारी पाहता भारतामध्ये ग्रामीण समाजात एकूण साक्षरता २९.५७ टक्के आहे, पैकी पुरुष ४०.६२ टक्के आणि स्त्रिया केवळ १७.९९ टक्के साक्षर आहेत. महाराष्ट्रात ग्रामीण भागात एकूण साक्षरता ३८.१५ टक्के आहे, पैकी पुरुष ५१.२५ टक्के आणि स्त्रिया २४.८८ टक्के साक्षर आहेत. कोल्हापूर जिल्हामध्ये ग्रामीण भागात एकूण साक्षरता ३९.७८ टक्के आहे, पैकी पुरुष ५५.१४ टक्के आणि स्त्रिया २४.३१ टक्के साक्षर आहेत. या विश्लेषणावरुन ग्रामीण समाजात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे, हे सिध्द होते. या उलट भारतातील शहरी समाजात एकूण साक्षरता ५७.१९ टक्के आहे पैकी पुरुष ६५.५८ व स्त्रिया ४७.६५ टक्के साक्षर आहेत. महाराष्ट्रात शहरी भागात एकूण साक्षरता ६३.९२ टक्के आहे पैकी पुरुष ७१.८० टक्के आणि स्त्रिया ५४.६५ टक्के साक्षर आहेत आणि कोल्हापूर जिल्हात शहरी भागात एकूण साक्षरता ६२.२६ टक्के आहे, पैकी पुरुष ७१.८८ टक्के आणि स्त्रिया ५१.५१ टक्के साक्षर आहेत. या विश्लेषणावरुन शहरी समाजात साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण समाजाच्या तुलनेत अधिक आहे.

(ड) महाराष्ट्रातील अनुसूचित जातीची साक्षरता --

अनुसूचित जातीचे लोक शिक्षणापासून अधिक प्रमाणात वंचित आहेत, त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यामागे प्राचीन हिंदू समाज व्यवस्थेतच तशी व्यवस्था करुन ठेवलेली होती. त्यांना समाजातील संकेतानुसार शिक्षणाचा अधिकार नाकारलेला होता. अध्ययन व अध्यापनापासून या जातीच्या लोकांना अलिप्त ठेवण्यात आले होते. इंग्रजीसत्ता असतानाही याच दृष्टिकोणाचा कांही प्रतिगामी लोकांनी पुरस्कार केला होता. १८५६ साली अनुसूचित जातीतील मुलास शाळा प्रवेश देण्यात नकार देण्यात आला होता. परंतु पुढे शासनाने हस्तक्षेप करुन १८५८ साली अनुदान घेणाऱ्या सार्वजनिक शाळामध्ये प्रवेश दिला पाहिजे असे ठरविले. अनुसूचित जातीच्या मुलांना वर्गाबाहेर बसून

शिक्षण शिकावे लागत असे. शैक्षणिक क्षेत्रातील या पिछेहाटीमुळे मागास वर्गातील लोकांना शासकीय नोकऱ्या, किफायतशीर नोकऱ्या , आणि उच्च जीवनाची संधी नव्हती. शिक्षणाच्या अभावी अनुसूचित जातीच्या लोकांचे जीवन मागासलेले राहिलेले होते. याचाच परिणाम असा झाला की भारताला स्वातंत्र्य मिळून ४० वर्ष पूर्ण झाली असतांनाही या गटातील लोकांचे साक्षरतेचे प्रमाण नगण्य आहे. या जातीच्या मुलांच्या पालकांना शिक्षणाचा लाभ मिळाला नसल्याने त्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाविषयी जाणीव नाही. आशा अनुसूचित जातीच्या पालकांची बहुतांशी मुले शिक्षणापासून वंचित राहिलेली आढळतात. सन १९८१ च्या अनुसूचित जातीच्या साक्षरतेच्या आकडेवारीवरून हे ध्यानात येते.

तक्ता क्र.४

अनुसूचित जातीची साक्षरता ( १९८१ च्या जनगणनेनुसार )

| राज्य | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य[2] | ३५.५५ | ४८.८५ | २१.५३ |
| कोल्हापूर जिल्हा[1] | ३५.०१ | ५०.४० | १८.८५ |
| करवीर तहसिल[3] | ४०.३४ | ५६.३५ | २४.२९ |
| कागल तहसिल | ३०.८८ | ४७.४४ | १३.४९ |

आधार -
1. Census of India,1981, Series-12,Maharashtra, Primary Census Abstract, p.27.
2. Census of India,1981, Series-I,Part-II B(ii) Primary Census Abstract Scheduled Caste,p.207.
3. Census of India,1981,District Census Handbook, Kolhapur,p.160.

तक्त्यातील माहितीवरुन अद्याप अनुसूचित जातीमध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रात हे निरक्षरतेचे प्रमाण जवळ जवळ ६५ टक्के , कोल्हापूर जिल्हात ६५ टक्के, करवीर तहसिल मध्ये ५९ टक्के आणि कागल तहसिल मध्ये ६९ टक्के अनुसूचित जातीचे लोक शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. या जातीच्या स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे जवळ जवळ ८० टक्के आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या आणि ब्रिटिशांच्याकाळापासून या जातीच्या लोकांना शिक्षणाच्या सोई उपलब्ध करुन दिल्या असताना त्यांना त्या सोईंचा उपयोग करुन घेता आलेला नाही म्हणून इतर जातीच्या तुलनेत अनुसूचित जातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आढळते.

## (३) कोल्हापूर जिल्हाचा शैक्षणिक इतिहास --

महात्मा जोतिराव फुले व क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले म्हणजे भारतातील आद्य लोकशिक्षक, व शिक्षिका होय. महात्मा जोतिराव फुले यांनी पिढ्यान् पिढ्या अज्ञानाच्या अंध:कारात पिचत पडलेल्या लोकांना ` विद्येविना मति गेली, मतिविना नीती गेली, नीतीविना गति गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले ` हा कानमंत्र त्यांना दिला. समाजाच्या सर्व अनर्थाचे मूळ कारण अविद्या आहे, हे ओळखून सर्व समाजाला जागे करण्यासाठी त्यांनी ` सत्यशोधक समाज ` स्थापन करुन सत्यशोधनाचे कार्यही केले. सत्य धर्माच्या दृष्टिकोनातून वर्चस्व,रुढीप्रामाण्य, पुरोहितशाही व अस्पृश्यता यावर त्यांनी वारंवार प्रहार केले. समाजात समतेचा नंदादिप तेवत राहावा म्हणून घरोघरी ज्ञानदीप लावण्याचा आटोकाट प्रयत्न केला. ब्राह्मणाच्या घरी लिहिणं, कुणब्याच्या घरी दाणं व महाराच्या घरी गाणं या परंपरागत उक्तिला प्रचंड धक्का देऊन सकलांना शहाणे करुन सोडावे याचा त्यांनी ध्यास घेतला होता. वरच्या थरातून खालच्या थरापर्यन्त पाझरत जाणाऱ्या लॉर्ड मॅकॉले यांच्या शिक्षण विचाराला विरोध करुन समाजाच्या सर्व थरामध्ये विद्येचा सुकाळ गेला पाहिजे यासाठी ते जन्मभर कटिबध्द राहिले.

महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रेरणेचा स्पर्श झालेल्या कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरुवात केली. शाहू महाराजांना महात्मा फुले प्रमाणे समाजातील सर्व जाती धर्मांच्या लोकांना शिक्षणाची सर्व दारे सताड उघडी सोडायची होती. आणि समाजातील दुर्बल, उपेक्षित, वंचित व दलित घटकांना शिक्षण संजीवनीने बलवान करण्याचा जो ध्यास महात्मा फुले यांना लागला होता तोच वारसा शाहू महाराजांनी पुढे चालू ठेवला. शिक्षणाच्या पायावर सर्व समाजाची उन्नती करता येईल हे जाणूनच राजर्षि शाहू महाराजांनी त्यांच्या काळात सार्वत्रिक व सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला कारण शिक्षणाशिवाय सारा समाज अनर्थाच्या वाटेवरील वाटसरु सारखा भटकत राहिल. शिक्षणाशिवाय सारा समाज मतिहीन होईल, नीतिभ्रष्ट होईल, गतीहीन होईल, वित्तशून्य होईल आणि कायमचा खचून जाईल या करिता सर्वांसाठी शाहू महाराजांनी शाळा, शिक्षण संस्था आणि वस्तिगृहे उघडली आणि राजर्षिंनी खेडेगांव घटक मानून शिक्षण प्रसाराला प्रारंभ केला. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार प्रभाविपणे व्हावा यासाठी २४ जुलै १९१७ रोजी एक हुकूम काढून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करुन शेवटी ११ सप्टेंबर १९१७ रोजी राजर्षिंनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आल्याचे एका जाहिरनाम्याने प्रसिध्द केले.

प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे या योजनेची पहिली कार्यवाही ४ मार्च १९१८ साली झाली. त्या प्रमाणे मुक्काम चिखली, पेटा, करवीर येथे पहिली प्राथमिक शाळा काढण्यात आली. या योजनेसाठी त्या काळात सुमारे पाऊण लाख रुपये खर्च केले. या वेळी सुमारे ४,६३० मुले शाळेत शिकत होती, नंतर सन १९२२ साली या योजनेसाठी सुमारे तीन लाख रुपये खर्च करण्यात आले. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा शुभारंभ झाल्यानंतर प्राथमिक शाळांची संख्या वाढत गेली. या योजनेची वाढ पुढील प्रमाणे झाली.--

तक्ता क्र.५

शाळा आणि विद्यार्थ्यांच्या संख्येतील वाढ

| वर्ष | शाळा | विद्यार्थी |
|---|---|---|
| १९१७-१९१८ | २७ | १,२९६ |
| १९१८-१९१९ | ९५ | ४,६३१ |
| १९१९-१९२० | १७० | ६,३६२ |
| १९२०-१९२१ | ३७६ | १७,२१८ |
| १९२१-१९२२ | ४२० | २२,००७ |

आधार : भगत, रा.तु : राजर्षि शाहू:शिक्षण विषयक विचार आणि कार्य ; चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, जून १९८१, पृ.६०.

शाहू महाराजांनी समाजातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळाले पाहिजे या साठी त्यांनी शिक्षण प्रसारावर अधिकाधिक लक्ष केन्द्रित केले , प्रत्येक जातीच्या मुलांना समान शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी बारा बलुतेदारांच्या आणि महारा - मागांच्या मुलांच्यासाठी वेगळ्या प्राथमिक शाळा न काढता सर्व मुलांना एकत्रित बसवावे व शिक्षण द्यावे असा राजर्षिंनी जाहीरनामा काढला होता. म्हणून या प्राथमिक शाळा म्हणजे स्वातंत्र्यपूर्वकाळातील जाती-निर्मूलनाची केन्द्रेच बनली.

(अ) कोल्हापूर जिल्ह्याच्या साक्षरतेतील वृध्दी --

शैक्षणिक आणि सामाजिक सुधारकांचा वारसा लाभलेल्या या कोल्हापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीत भरीव वाढ झालेली नाही. अद्यापही

निम्म्यापेक्षा अधिक लोक शिक्षणापासून वंचित राहिलेले आढळतात. कोल्हापूर जिल्हामध्ये शैक्षणिक प्रगती झाली असली तरी ही वाढत्या लोक संख्येच्या वाढीच्या प्रमाणात कमी आहे. अद्यापही शिक्षण प्रसाराला म्हणावा तसा जोर आलेला आढळत नाही हे १९०१ ते १९८१ च्या साक्षरतेच्या प्रमाणात झालेल्या वाढीच्या आकडेवारीवरून लक्षात येते.

तक्ता क्र.६

कोल्हापूर जिल्हातील साक्षरतेची वाढ ( १९०१ ते १९८१ )

| वर्ष | एकूण | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| १९०१ | ४.०६ | ७.७५ | ०.२७ |
| १९११ | ४.१२ | ७.६३ | ०.४८ |
| १९२१ | ८.५८ | १५.०८ | १.७० |
| १९३१ | ६.५९ | ११.८० | १.१३ |
| १९४१ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही |
| १९५१ | १२.५० | २०.८० | ४.०० |
| १९६१ | २६.३० | ४०.०९ | १२.०४ |
| १९७१ | ३५.३७ | ४९.७८ | २०.३४ |
| १९८१ | ४५.३६ | ५९.४५ | ३०.७९ |

आधार : Census of India, 1981, District Census Handbook, Kolhapur, p.17.

सन १९०१ ते १९८१ या ८० वर्षांच्या कालावधीमध्ये कोल्हापूर जिल्हाच्या साक्षरतेचे प्रमाण ४.०६ टक्क्यावरुन ४५.३६ टक्क्यापर्यन्त वाढले आहे. म्हणजे ८० वर्षांमध्ये साक्षरतेच्या प्रमाणात केवळ ४१.३० टक्केच वाढ झाल्याचे दिसते. ही साक्षरतेची वाढ एकूण लोक संख्यावाढीच्या प्रमाणात कमी आहे. कोल्हापूर जिल्हामध्ये अद्यापही ५४.६४ टक्के लोक शिक्षणापासून वंचित आहेत. त्यात स्त्रियांच्या शैक्षणिक वंचिततेचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे जवळ जवळ ७० टक्के आहे हे वरील तक्त्यातील माहितीच्या विश्लेषणावरुन ध्यानात येते.

(ब) कोल्हापूर जिल्हातील अनुसूचित जातीची साक्षरता --

कोल्हापूर जिल्हातील अनुसूचित जातीच्या लोकांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. शासनाने या जातीच्या मुलांच्याकरिता शैक्षणिक सोई-सवलती उपलब्ध करुनही त्यांना त्याचा लाभ घेता आलेला नाही, त्यामुळे या जातीमध्ये शैक्षणिक वंचितता इतर जातीच्या तुलनेत अधिक दिसून येते. पंचवार्षिक योजनांव्दारा या जातीच्या लोकांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला , परंतु १९६१ ते १९८१ च्या आकडेवारीवरुन या जातीच्या लोकांच्यामध्ये साक्षरतेमध्ये फारशी वृध्दी झालेली दिसत नाही.

तक्ता क्र.७

कोल्हापूर जिल्हातील अनुसूचित जातीच्या साक्षरतेतील वाढ
(१९६१ ते १९८१ पर्यन्तची )

| वर्ष | प्रमाण |
|---|---|
| १९६१[1] | ११.११ |
| १९७१ | २६.३१ |
| १९८१[2] | ३५.०१ |

आधार: 1. Chitnis, Suma : Literacy and Educational Enrolment Among the Scheduled Castes of Maharashtra, 1971, p.3.

2. Census of India, 1981, Series-I, Part-II B(ii) Primary Census Abstract Scheduled Castes, p.219.

वरील तक्त्यावरुन १९६१ साली अनुसूचित जातीची साक्षरता ११.११ टक्के होती त्यात वाढ होऊन १९८१ साली ३५.०१ टक्के झाली म्हणजे १९६१ ते १९८१ या २० वर्षांच्या काळात केवळ २३.९० टक्केच साक्षरता वाढली म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील या जातीमध्ये साक्षरतेच्या वाढीचे प्रमाण अतिशय कमी आहे. परंतु एकूण निरक्षरतेचे प्रमाण जवळ जवळ ६५ टक्के आहे. यावरुन या जातीचे लोक अज्ञानी, अंध:श्रध्दा व दारिद्र्य या मुळे त्यांना शिक्षण घेणे शक्य झालेले नाही. पालक त्यांच्या मुलांचा मजूरीसाठी व कुटूंबाच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून उपयोग करुन घेतात.

(४) मौजे - सांगाव आणि मौजे - म्हाळुंगे खेड्यांची साक्षरता --

अभ्यासासाठी निवडलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील मौजे - सांगाव आणि करवीर तालुक्यातील मौजे - म्हाळुंगे या दोन्ही खेड्यामध्ये शैक्षणिक वंचितता अधिक आढळुन येते. या खेड्यामध्ये साक्षरता निम्म्यापेक्षाही कमी आहे. सन १९८१ च्या जनगणनेवरुन याची स्पष्ट कल्पना येऊ शकते --

तक्ता क्र.८

मौजे - सांगाव आणि मौजे - म्हाळुंगे खेड्यांची साक्षरता

| गांव | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| मौजे - सांगाव | ४६.१९ | ५९.१४ | ३१.९९ |
| मौजे - म्हाळुंगे | ३६.२७ | ५३.७५ | १७.६८ |

आधार : Census of India, 1981, District Census Handbook Kolhapur, p.166 & 186.

वरील आकडेवारीवरुन मौजे - सांगाव खेड्यामध्ये एकूण साक्षरतेचे प्रमाण ४६.१९ टक्के आहे, पैकी पुरुष ५९.१४ टक्के आणि स्त्रिया ३१.९९ टक्के साक्षर आहेत. मौजे - म्हाळुंगे खेड्यामध्ये एकूण साक्षरतेचे प्रमाण ३६.२७ टक्के आहे, पैकी पुरुष ५३.७५ टक्के आणि स्त्रिया १७.६८ टक्के साक्षर आहेत. या माहितीच्या विश्लेषणावरुन आपल्या असे लक्षात येते की, दोन्हीही खेड्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण निम्म्यापेक्षा अधिक आहे. त्यात स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक असून ते जवळ जवळ मौजे-सांगाव खेड्यात ७० टक्के तर मौजे म्हाळुंगे ८१ टक्के आहे. मौजे - सांगाव हे खेडे दळणवळणाच्या सोईंनी युक्त आहे. त्याच बरोबर या गावामध्ये प्राथमिक,माध्यमिक शाळेची सोय आहे. उच्च माध्यमिक शाळेचीही सोय केवळ १ ते १।। किलोमिटर अंतरावरच आहे. मुलांना पदवीपातळीवरील शिक्षण घेण्याच्यादृष्टीने कागल आणि कोल्हापूर शहर जवळच आहेत. याचाच परिणाम म्हणून या खेड्यातील साक्षरतेचे प्रमाण मौजे-म्हाळुंगे खेड्याच्या तुलनेत अधिक आहे. मौजे म्हाळुंगे खेडे दळणवळणाच्या दृष्टीने गैर सोईचे आहे. या खेड्यामध्ये केवळ प्राथमिक शाळेची सोय आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेसाठी येथील मुलांना इतर ठिकाणी जावे लागते. यामुळे या खेड्यातील साक्षरतेचे प्रमाण मौजे - सांगाव खेड्याच्या तुलनेत कमी आहे.

भारत सरकारने आणि महाराष्ट्र सरकारने शिक्षणापासून वंचित राहिलेल्या लोकांना साक्षर करण्यासाठी निरनिराळे उपक्रम राबविले आहेत. समाजातील प्रत्येक जाती धर्माच्या लोकांना शिक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी जे लोक गरीब आणि मागासलेले आहेत त्यांच्यासाठी मोफत शैक्षणिक सुविधा पुरविल्या जात आहेत. प्राथमिक शिक्षण एक व्यक्तीची मुलभूत गरज समजून गाव तेथे शाळा उभ्या केल्या जात आहेत. त्याच बरोबर खेड्यातील विद्यार्थ्यांना माध्यमिक - उच्च माध्यमिक आणि पदव्युत्तर पातळीवरचे शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी मुलांना सोईस्कर अशा ठिकाणी शाळांची व महाविद्यालयांची सोय उपलब्ध करुन दिली आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा किंबहुना समाजाचा विकास साधता येतो, या दृष्टिकोणातून शासनाने प्रस्थापित शैक्षणिक

पध्दतीत बदल करुन समाजाभिमुख शिक्षण बनविले आहे. समाजातील प्रौढ - निरक्षर स्त्री-पुरुषांना व्यावहारिक ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून १९८० पासून प्रौढ साक्षर विभाग प्रत्येक जिल्हाच्या ठिकाणी सुरु करुन जिल्हातील प्रत्येक गावामध्ये प्रौढ साक्षर वर्ग सुरु करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्याच प्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाकडे ज्या त्या भागातील प्रौढांना साक्षर बनविण्यासाठी प्रौढ साक्षर व लोक संख्या शिक्षण अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. अर्थातच शासनाचा शिक्षणविषयक कार्यक्रम अधिक व्यापक कसा होईल आणि समाजातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या लोकांना शिक्षणाचा लाभ कसा उठवता येईल या दृष्टिनेही प्रयत्न सुरु आहेत. रेडिओ, टेलिव्हिजन या सारख्या प्रसार साधनाच्या माध्यमातून शिक्षणविषयक महत्व लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न शासनाचा चालू आहे. त्याच बरोबर ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांना शिक्षणाचा लाभ घेता यावा म्हणून दळणवळणसाधनांचा विस्तार केला जात आहे.

समाजातील दुर्बल, मजूर, भूमिहीन, दलित वर्गात शिक्षणापासून वंचित राहाण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यासाठी शासनाने या वर्गातील मुलांना शिक्षण घेता यावे व त्यांच्या जीवनमानात सुधारणा करता याव्यात म्हणून त्यांच्यासाठी मोफत शिक्षणाची सोय केली आहे. त्यांच्या मुलींच्यासाठी शाळेतून पाठ्य-पुस्तके, वह्या, शालेय गणवेश या सारख्या शालोपयोगी वस्तूंचा पुरवठा केला जात आहे. त्यांच्या मुलांना शाळेची आवड निर्माण व्हावी म्हणून शाळेतून मधल्या सुट्टीच्या वेळी दुध दिले जाते, त्याच बरोबर हुशार होतकरु मुलांना त्यांचे शिक्षण पूर्ण करता यावे म्हणून शिष्यवृत्ती दिल्या जात आहेत. आणि या वर्गातील मुलां-मुलींना अधिक प्रमाणात शिक्षणाचा लाभ घेता यावा म्हणून प्रयत्न केले जात आहेत.

शिक्षण प्रसाराला जोर देण्याच्यादृष्टिने इंग्रजी सत्तेपासूनच प्रयत्न सुरु आहेत. इंग्रजांनी भारतात त्यांच्या देशाप्रमाणे इ.स.१८५४ च्या वुडच्या

खलीत्याप्रमाणे सन १८८५ पासून आधुनिक शिक्षण पर्वाला प्रारंभ केला होता. याला आज १०४ वर्षे पूर्ण होऊन गेली आहेत. त्याच प्रमाणे भारतात महात्मा जोतिराव फुले, आगरकर, राजर्षि छत्रपती शाहू महाराज, आंबेडकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी थोर अभ्यासप्रेमी विचारवंतानी शिक्षण प्रसाराला जोराची चालना दिली. आणि समाजातील सर्व वर्गातील लोकांना शिक्षणाचा लाभ मिळावा म्हणून प्रयत्न केला. आज भारतात शैक्षणिक प्रगतीचा मागोवा घेतला तर अद्यापही निम्म्यापेक्षा अधिक लोक शिक्षणापासून वंचित राहिलेले आहेत. समाजातील स्त्री वर्गाच्या शैक्षणिक प्रगतीचा मागोवा घेतला तर आजही जवळ जवळ ७५ टक्के स्त्रिया शिक्षणापासून अलिप्त राहिल्या आहेत. त्याच प्रमाणे अनुसूचित जातीच्या लोकांच्यामध्येही शैक्षणिक वंचिततेचे प्रमाण सर्वाधिक आहे. शासन, अभ्यास प्रेमी, समाजसुधारक यांच्याकडून एवढा प्रयत्न आणि अमाप पैसा, शाळेच्या इमारती उभ्या करुनही समाजातील प्रत्येकांच्या घरापर्यन्त शिक्षणाची पवित्र गंगा जाऊन पोहोचू शकलेली नाही.

राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा वारसा लाभलेल्या कोल्हापूर जिल्हाच्या शैक्षणिक प्रगतीचा मागोवा घेतला तर कोल्हापूर जिल्हात शिक्षणाच्या कार्याला जोराची गती देण्याचा प्रयत्न चालू असतानाही या भागातील जवळ जवळ ५० टक्के जनता शिक्षणापासून वंचित राहिलेली आहे. कोल्हापूर जिल्हातील कागल आणि करवीर तालुक्यातील ६ ते १४ आणि १५ ते २० या लहान व तरुण वयोगटातील मुले-मुली अधिक प्रमाणात शिक्षणापासून वंचित राहाण्यामागच्या परिस्थितीचा शोध घ्यावा आणि या लहान व तरुण मुलांच्या मनाचा व त्यांच्यातील सुप्त गुणांचा विकास घडविणाऱ्या शिक्षणापासून त्यांना वंचित राहता येऊ नये यासाठी शासनाला व समाजाला त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न करता यावेत या हेतूने मी " मुलांची शैक्षणिक वंचना - कोल्हापूर जिल्हातील दोन खेड्यांचा अभ्यास " हा संशोधन-अभ्यास विषयाची निवड केली आहे.